I.I.F.-I (एकीकृत अन्‍वेषणफॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 173 B.N.S.S)**

## प्रथम खबर अहवाल

**(बी एन एस एस संहिताच्या कलम 173 अन्वये)**

1. **District (जिल्हा):** सोलापुर ग्रामीण **P.S. (पोलीस ठाणे):** वैराग **Year (वर्ष):** 2026

   **FIR No. (प्रथम खबर क्र.):** 0178 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 29/04/2026 00:36 वाजता

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence(गुन्ह्याची घटना):**

   1 **Day (दिवस):** मंगळवार **Date from (दिनांक पासून):** 28/04/2026 **Date To (दिनांक पर्यंत):** 28/04/2026

   **Time Period (कालावधी):** प्रहर ६ **Time From (वेळेपासून):** 15:26 तास **Time To (वेळेपर्यंत):** 16:46 तास

   (b) **Information received at P.S. (पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याचा):** **Date (दिनांक):** 28/04/2026 **Time (वेळ):** 20:00 तास

   (c) **General Diary Reference (ठाणे दैनंदिनी संदर्भ):** **Entry No. (नोंद क्र.):** 001 **Date and Time (दिनांक आणि वेळ):** 29/04/2026 00:36 तास

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

   1. **(a) Direction and distance from P.S. (पोलिस ठाण्या पासून दिशा आणि अंतर):** पूर्व, 20 कि.मी. **Beat No. (बीट क्र.):**

      **(b) Address (पत्ता):** उपळे दुमाला,बार्शी

      **(c) In case, outside the limit of this Police Station, then Name of P.S. (पोलीस ठाण्याच्या हद्दी बाहेर असल्यास, पोलीस ठाण्याचे नाव):**

      **District (State) (जिल्हा (राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार / माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** शैलेश चंद्रकांत पवार

(b) **Father's/Husband's Name (वडिलांचे/पतीचे नाव):**

(c) **Date/Year of Birth (जन्मतारीख / वर्ष):** 1985

(d) **Nationality (राष्‍ट्रीयत्‍व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No. (पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख ):** **Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID Details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN) (ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पैन कार्ड))**

| S. No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्र क्रमांक) |
|---|---|---|

(h) **Occupation (व्यवसाय):**

(i) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्ता प्रकार) | Address (पत्ता):: |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सोलापूर, सोलापूर तालुका, सोलापुर ग्रामीण, महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सोलापूर, सोलापूर तालुका, सोलापुर ग्रामीण, महाराष्ट्र, भारत |

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल क्र.):** 91-9112121668

**7. Details of known / suspected / unknown accused with full particulars (ज्ञात / संशयित / अज्ञात आरोपींचे संपूर्ण तपशील):**

**Accused More Than (अज्ञात आरोपी एका पेक्षा जास्त असतील तर संख्या):** 0

| S. No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address(वर्तमान (पत्ता)) |
|---|---|---|---|---|
| 1 | हेमंत चंद्रकांत फुलारी | | | 1. 407,चौथा मजला,मन्मित ब्लसम अपार्टमेंन्ट,Town/Village (शहर / गाव): जुळे सोलापूर,Tehsil (तहसील): सोलापूर,Police Station (पोलीस ठाणे): विजापुर नाका,District (जिल्हा): सोलापुर शहर,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant / informant ( तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे ):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S. No. (अ.क्र.) | Propertty Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (विवरण) | Value(In Rs/-) मुल्य (रु. मध्ये) |
|---|---|---|---|---|
| | | | | |

**10. Total value of property (In Rs/-) मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये) :**

**11. Inquest Report / U.D. case No., if any (मरणान्वेषण अहवाल/अकस्मात मृत्यू प्रकरण क्र. जर असल्यास):**

| S. No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.) |
|---|---|

**12. First Information contents (प्रथम खबर हकिगत):**

फिर्याद दि. 28/04/2026

मी शैलेश चंद्रकांत पवार, वय - 41 वर्षे, व्यवसाय नोकरी, पद-पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सोलापूर मो. नं. 9112121668 समक्ष फिर्याद देतो की, मी लाचलुचपत

प्रतिबंधक विभाग सोलापूर युनिट येथे माहे जुलै 2025 पासून पोलीस निरीक्षक या पदावर कार्यरत आहे.

दि.28/04/2026 रोजी 11.30 सुमारास आम्ही कार्यालयात असताना श्री प्रशांत चौगुले, पोलीस उपअधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सोलापूर यांनी आम्हास त्यांचे कक्षामध्ये बोलावून घेतले आणि तक्रारदार अस्लम शहानूर शेख, वय-30, व्यवसाय- शेती, रा. मु.पो.नांदणी, ता. बार्शी, जि. सोलापूर यांनी फोन करून त्यांचेकडे होत असलेल्या लाच मागणीबाबत तक्रार दिली असून त्याअनुषंगाने आजरोजी पडताळणी करून पुढील कारवाई करणेबाबत आम्हाला तोंडी आदेश दिले. त्यानुसार आम्ही दि.28/04/2026 रोजी आमचेकडील अंमलदार यांचे मार्फत मा. आयुक्त, सोलापूर महानगर पालिका, सोलापूर या कार्यालयास पंच मिळणेबाबत पत्रव्यवहार करून दोन शासकिय पंच उपलब्ध करून घेतले. सुमारे 12.00 वा चे सुमारास 1) प्रविण किसन पोतरे, पद- कनिष्ठ लिपीक, नेम- मुख्यलेखा परिक्षक कार्यालय, सोलापूर महानगर पालिका, सोलापूर व 2) आकाश विष्णु कोकरे, पद- कनिष्ठ अभियंता, नेम- नगर अभियंता, सोलापूर महानगर पालिका, सोलापूर हे दोन्ही पंच साक्षीदार ला.प्र.वि सोलापूर या कार्यालयात आमच्या समक्ष हजर झाले. त्यावेळी मी दोघा पंचांना माझी ओळख सांगुन तक्रारदार अस्लम शहानूर शेख, वय-30, व्यवसाय- शेती, रा. मु.पो.नांदणी, ता. बार्शी, जि. सोलापूर यांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने उपळे (दु) येथे जाऊन पडताळणी व पुढील कारवाई करणेकामी पंच म्हणून उपस्थित राहून काम करणेस तयार आहात का? अशी विचारणा करता, दोन्ही पंच साक्षीदार यांनी पंच म्हणून काम करण्यास त्यांची संमती दिली. त्यानंतर आम्ही आमच्या कार्यालयातील पोह/571 मुल्ला, पोह/1616 जाधव व चालक पोकॉ/2026 श्रीराम यांना बोलावून घेतले आणि दोन्ही पंचांची ओळख करून देऊन गोपनीय कामकाजासाठी बाहेर जायचे असल्याचे सांगुन त्याकरीता आवश्यक सर्व साहित्य शासकीय वाहनात घेण्यास सांगितले. त्यानुसार गोपनीय कामाकरीता आवश्यक व्हाईसरेकॉर्डर, मेमरीकार्ड, लॅपटॉप, पिं्रटर, सील, अॅन्थ्रासीन पावडर, अल्ट्राव्हायोलेट दिवा इ. सर्व साहित्य ला.प्र.वि कडील शासकीय वाहन एम.एच.12 यु.सी 4108 या वाहनामध्ये ठेवण्यात आले. त्यानंतर 13.00 वा चे सुमारास शासकीय वाहनातून आम्ही, दोन्ही शासकीय पंच, पथकातील अंमलदार असे सर्वजण उपळे (दु) दिशेने रवाना झालो. यादरम्यान तक्रारदार यांच्याशी संपर्कात राहून त्यांच्या सांगण्यानुसार तुळजापूर - बार्शी रोडवरील उपळे (दु) गावच्या अलीकडे श्री. स्वामी समर्थ मंदिर येथे तक्रारदार थांबलेल्या ठिकाणी आम्ही 14.30 वा. जाऊन पोहोचलो. सदरठिकाणी गेल्यानंतर आम्ही तक्रारदार शेख यांना शासकीय वाहनामध्ये बोलावून आमची, दोन्ही शासकीय पंचांची ओळख करून दिल्यानंतर आम्ही त्यांना पंचासमक्ष त्यांचे नाव पत्ता व त्यांची तक्रारीबाबत थोडक्यात हकीकत विचारली असता त्यांनी त्यांचे नाव श्री. अस्लम शहानूर शेख असे असल्याचे सांगून, मंडळ अधिकारी कार्यालय उपळे (दु) येथील मंडळ अधिकारी श्री. फुलारी हे मौजे नांदणी येथील माझे आजीचे वडील कै.काशिम आबु मुलाणी यांचे नांवे असलेल्या शेतजमीनीचे साताबारा उता-यावर माझी आजी श्रीमती कोंदनबी वली शेख यांचे वारस नोंद घेतली असून, घेण्यात आलेल्या वारस नोंदीस प्रमाणित करण्यासाठी 15000/- लाच घेतली आहे व त्यानंतर सातबारा उता-याचे लॉक काढुन देण्यासाठी (अनलॉक करण्यासाठी) 3,000/- रू लाचेची मागणी करीत असून त्यांच्याविरूध्द योग्य ती कारवाई करण्यात यावी अशा आशयाची तक्रार सांगुन त्यांची सविस्तर तक्रार स्व:हस्ताक्षरामध्ये लिहुन दिली. त्यानंतर सदरची तक्रार आम्ही व दोन्ही शासकीय

पंचांनी वाचून त्यावर सहया केल्या.

तक्रारदार अस्लम शहानूर शेख यांनी दिलेल्या तक्रारीची पडताळणी करण्यासाठी पंच क्र.1 म्हणून प्रविण किसन पोतरे व पंच क्र.2 म्हणून आकाश विष्णु कोकरे यांनी काम पाहण्याचे ठरले. त्यानंतर आम्ही तक्रारदार शेख, दोन्ही पंच साक्षीदार यांना आमचेकडील सोनी कंपनीचे IC RECORDER ICD-UX570F 5V SONY CORP. MADE IN CHINA 1080939 व्हॉईस रेकॉर्डर व NEXUS कंपनीचे 08 जीबीचे मेमरीकार्ड सदर मेमरीकार्डवर NEXUS Micro 10 SD HC 8 GB त्याच्या मागील बाजूस NKS-XY1/26 CE MMC08AX215F-TO DLD XY 2601 MADE IN TAIWAN असे वर्णनाचे नवीन मेमरीकार्ड दाखवुन त्यांचा वापर व उपयोग समजावून सांगितला. त्यानंतर पोह/571 मुल्ला यांचे मोबाईलमध्ये तक्रारदार व दोन्ही पंचाचे पडताळणी करवाईचे अनुषंगाने व्हिडीओ चित्रीकरण करण्याचे ठरवले. त्यावेळी पोह मुल्ला यांचा मोबाईल दाखवीला असता सदरचा मोबाईल पाहता तो रिअलमी कंपनीचा असुन त्यांचे मॉडेल pro-14 असे आहे. तसेच सदर मोबाईल फोनची Operating System Android आहे. मी दिलेल्या निर्देशावरुन पोह/ 571 मुल्ला यांनी सदर मोबाईला पाठीमागील बाजूस एकुण तीन कॅमेरे असल्याचे आम्हाला दाखविले. सदर मोबाईलमध्ये मेमरी कार्ड स्लॉट नसल्याने पडताळणी कारवाईनंतर व्हिडीओ चित्रीकरण हे मोबाईल मधील अंतर्गत स्टोरेजवर चित्रीकरण करुन त्यानंतर सदरचे चित्रीकरण हे पुन्हा मेमरीकार्डवर सेव्ह करण्याचे ठरिवण्यात आले. त्यानंतर तक्रारदार शेख व दोन्ही पंचांचे निवेदन पडताळणीपुर्व निवेदन 15.26 वा चे सुमारास व्हॉईसरेकॉर्डरद्वारे रेकॉर्ड करून घेण्यात आले. तक्रारदार आणि पंचांची निवेदने घेताना त्याचे व्हिडीओ चित्रीकरण वर नमुद मोबाईलच्या माध्यमातून पोह/571 मुल्ला यांनी केले. त्यानंतर तक्रारदार शेख व पंच क्र.1 पोतरे यांना पडताळणीकामी योग्य त्या सुचना देऊन 15.31 वा चे सुमारास आम्ही मंडळ अधिकारी यांची भेट घेण्यासाठी उपळे (दु) येथे रवाना करून 15.50वा दरम्यान पडताळणी केली. पडताळणी दरम्यान मंडळ अधिकारी फुलारी यांनी पंचासमक्ष तक्रारदार यांचे आजीचे नांवे घेतलेल्या वारस नोंदीस प्रमाणित करण्यासाठी व सातबारा उता-याचे लॉक काढून देण्यासाठी लोकसेवक मंडळ अधिकारी फुलारी यांनी काढा ते..साडे तीन.. असे म्हणून लाच मागणी केली. त्यावर तक्रारदार यांनी साडे तीन काय ? साडे तीन हजार..असे म्हणाले असता, मंडळ अधिकारी यांनी माग पाचशे राहिलय..आणि आताचे तीन..काढा लगेच काय आता..तेवढ्यासाठी तुम्ही थांबू नका..असे म्हणाले. त्यावर तक्रारदार यांनी थोड साहेब कमी..म्हणजे कस, आमचबी गरिबीतन थोड हिशोबान घेतल म्हणजी असे म्हणाले त्यावर मंडळ अधिकारी यांनी आता मी काय आता.. तुम्ही सांगिल्यावरच ते लॉक असलेली बाहेर काढणं म्हणजे चेष्टा आहे का सांगा असे म्हणाले त्यावर तक्रारदार बरोबर हाय की..आमच्याबी गरिबीतन थोड.. असे म्हणाले त्यावर मंडळ अधिकारी यांनी ऐकुन घ्या..काल दिवस गेल माझ ह्याच्यामध्ये..काल दिवस गेलय..असे म्हणाले त्यावर तक्रारदार यांनी बरोबर हाय की..असे म्हणाले त्या मंडळ अधिकारी यांनी आता तुमच्यामुळ झाल माझ मुळ नाही असे म्हणाले त्यावर तक्रारदार यांनी कायतर कमी जास्त करा..आमच बी गरीबीतन हाय दुसर काय नाय..करुन खायच आमच शेतीचा धंदा हाय.. असे म्हणाले त्यावर मंडळ अधिकारी यांनी काय तुम्ही..हे बघा तुम्ही कस करल तस असे म्हणाले त्यावर तक्रारदार यांनी बर..किती ? म्हणजी किती आणायच मला सांगा म्हणजी असे म्हणाले त्यावर मंडळ अधिकारी यांनी आता तुम्हाला बोललो मी असे म्हणाले त्यावर तक्रारदार यांनी किती आणायच.. असे म्हणाले त्यावर मंडळ अधिकारी यांनी तुम्हाला किती द्यायचे

द्या माझ काय नाय.. असे म्हणाले त्यावर तक्रारदार यानी तुम्ही तुमच्या तोंडान सांगितल म्हणजे..असे म्हणाले त्यावर मंडळ अधिकारी ऐ मी सांगणार नाय..आता सांगितलय, ह्याला ह्याच्या व्यतीरीक्त तुम्हाला काय द्यायचय द्या..मोकळ.. तीन द्या...बाकी काय असतय..माझी काय जास्त.. तीन द्या असे म्हणाले त्यावर तक्रारदार यांनी तीन हजार आणायचे का..थोड कमी जास्त घेतल म्हणजे असे म्हणाले त्यावर मंडळ अधिकारी यांनी तुमचे मागचे पाचशे राहिलं होती ते द्यायच असेल तर द्या नाहीतर सोडा..आमच काय नाही...असे म्हणाले त्यावर तक्रारदार यांनी ठिक हाय..येतो दहा मिनीटात पैसे घेवून असे म्हणाले त्यावर मंडळ अधिकारी यांनी ठिक हाय असे बोलून लाच रक्कम त्यांच्याकडे आणून देण्यास सांगितले. अशाप्रकारे मंडळ अधिकारी फुलारी यांची स्वतः करीता तडजोडीवरून 3000/- रू लाचेची मागणी केल्याचे स्पष्ट झाले.

त्यानंतर तुळजापूर- बार्शी रोडवरील उपळे (दु) गावाचे अलीकडे श्री.स्वामी समर्थ मंदिर येथे शासकीय वाहनांमध्ये तक्रारदार यांनी हजर केलेल्या नोटांचे क्रमांक लिहून घेणे, तक्रारदार व दोन्ही पंचांना अॅन्थ्रासीन पावडरची माहिती देऊन त्याचे प्रात्यक्षिक करणे व हजर केलेल्या नोटांना पावडर लावणे इ. सापळापुर्व कारवाई करून, सापळा कारवाईच्या अनुषंगाने तक्रारदार, दोन्ही पंच व सापळा पथकातील अंमलदारांना आवश्यक त्या सुचना देण्यात आल्या. त्यानंतर पडताळणी कारवाई वापरलेले मेमरीकार्ड सापळा कारवाईत वापरण्याचे सर्वानुमते ठरले. त्यानंतर तक्रारदार व दोन्ही पंचांचे सापळा कारवाईच्या अनुषंगाने वर नमुद मेमरीकार्डमध्ये 16.23 वा व्हॉईसरेकॉर्डरव्दारे निवेदने रेकॉर्ड करून घेतले. सदरचे निवेदन रेकॉर्ड करून घेताना पोह/571 मुल्ला यानी त्यांचे मोबाईलमध्ये व्हिडीओ चित्रीकरण केले. त्यानंतर तक्रारदार शेख व पंच क्र.1 पोतरे यांना मंडळ अधिकारी श्री फुलारी यांची भेट घेण्यासाठी 16.27 वा उपळे (दु) येथे रवाना केले. त्यांचे पाठोपाठ आम्ही स्वतः, पंच क्र.2, पोह/571 मुल्ला, पोह/1616 जाधव व चालक पोकॉ/2026 श्रीराम असे शासकीय वाहनातून तुळजापूर- बार्शी रोडवरील उपळे (दु) गावाचे अलीकडे श्री.स्वामी समर्थ मंदिर येथून निघून उपळे (दु) गावाच्या दिशेने रवाना झालो.

सापळा कारवाईदरम्यान तक्रारदार शेख व पंच क्र.1 पोतरे हे दोघे उपळे (दु) येथील मंडळ अधिकारी श्री. फुलारी बसत असलेले ठिकाणी जावून त्यांची भेट घेतली. सदर वेळी मंडळ अधिकारी यांनी तक्रारदार यांना उद्देशून काय एवढ उशीर असे म्हणाले त्यावर तक्रारदार यांनी लई उन लागलाय ओ.. असे म्हणाले त्यावर मंडळ अधिकारी यांनी कुठ गेला होता..असे म्हणाले त्यावर तक्रारदार यांनी काय सांगू आता.. पैसेच मिळणा होत मित्रापासन आणल...असे म्हणाले त्यावर मंडळ अधिकारी यांनी कुंठ असे म्हणाले त्यावर तक्रारदार यांनी जावूदे मेळ लागला कसतर असे म्हणाले व त्यानंतर मंडळ अधिकारी व तक्रारदार हे कार्यालया बाहेर आले व किती आणले..दिवून टाका पैसे असे मंडलअधिकारी म्हणाले.. त्यावर तक्रारदार यांनी काढून द्या की उतारे असे म्हणाले त्यावर मंडळ अधिकारी यांनी काढून देतो ओ दया..काय..असे म्हणाले त्यावर तक्रारदार यांनी काढल म्हणजी बिनघोरी होतय... सगळं.. लॉक निघाल ना माझं.. असे म्हणाले त्यावर मंडळ अधिकारी काढतोत टेन्शन घेवू नका.. आमच कामच हाय ते..किती हाय..असे म्हणाले.. त्यावर तक्रारदार यांनी मंडळ अधिकारी यांचे समोर लाच रक्कम धरून हे बघा मोजा.. असे म्हणाले त्यावर मंडळ अधिकारी यांनी किती हाय बघा.. सांगा.... किती हाय सांगा निस्त.. तोंडी सांगा ओ.. किती.. आवघड हाय.. अं.. असे म्हणून तक्रारदार शेख यांचे हातातील लाच रक्कम उजव्या हाताने घेवून मोजून ठिक आहे

असे म्हणून मंडळ अधिकारी श्री. फुलारी यांनी लाच रक्कम स्विकारली. सदरवेळेस तक्रारदार यांनी त्यांचा डावा हात डोक्यावरून फिरवून लाच स्वीकारल्याचा इशारा दिला. त्यावेळी त्या परिसरात सापळा लावून थांबलेले आम्ही सर्वजण मंडळ अधिकारी फुलारी यांना 16.46 वा चे सुमारास रंगेहात ताब्यात घेवून मंडळ अधिकारी श्री.फुलारी बसत असलेले खोली पाहता ते व्हिजन कॉम्प्युटर (महा-ई-सेवा केंद्र) ॲन्ड माती परिक्षण केंद्र अशी होती. त्यानंतर मंडळ अधिकारी फुलारी यांना ताब्यात घेण्यात आल्यावर महा-ईसेवा केद्रामध्ये जावून लोकसेवक फुलारी यांचे नेसते पॅन्टचे समोरील उजव्या बाजूचे खिशामध्ये ठेवलेली लाच रक्कम पंचासमक्ष ताब्यात घेण्यात आली. त्यानंतर पंच क्र.2 कोकरे यांनी सदर नोटांच्या क्रमांकाची तपासणी केली असता ते तक्रारदार यांनी हजर केलेल्या नोटांशी तंतोतंत जुळून आले. महा-ई-सेवा केंद्रामध्ये कृत्रिम अंधार करून मंडळ अधिकारी यांचे दोन्ही हाताचे, नेसते पॅन्टचे समोरील उजव्या बाजूचे खिशाचे तोंडास तसेच त्यांच्या ताब्यातून मिळालेल्या नोटांची अल्ट्रा व्हायोलेट दिव्याच्या प्रकाशात तपासणी करता त्यावर ॲन्थ्रासीन पावडरची हिरवट चकाकी दिसून आली. त्यानंतर व्हिजन कॉम्प्युटर (महा-ई-सेवा केंद्र) ॲन्ड माती परिक्षण केंद्रची अधिक माहिती घेतली असता श्री. अक्षय सोनटक्के, रा. उपळे (दु) ता. बार्शी, जि. सोलापूर हे चालवित असल्याचे समजले. त्यानंतर आम्ही, दोन्ही पंच व सापळा पथक मंडळ अधिकारी श्री. फुलारी यांच्यासह वैराग पोलीस ठाणे, सोलापूर ग्रामीण येथे आल्यावर सदर ठिकाणी संभाषणाचा उतारा काढून सविस्तर पडताळणी, सापळापुर्व व यशस्वी सापळा पंचनामा करण्यात आला.

तरी दि.28/04/2026 रोजी तक्रारदार अस्लम शहानूर शेख यांनी दिलेल्या तक्रारीवरुन करण्यात आलेल्या पडताळणी व सापळा कारवाईदरम्यान तक्रारदार यांचे आजीचे वडील मयत झालेले असलेने त्यांचे नावे असलेल्या शेतजमीनीचे 7/12 उतारावर वारस म्हणून त्यांचे आजीचे नांव नोंद होणेकरीता दिलेले अर्जावरून तलाठी यांनी धरलेल्या नोंदीस प्रमाणित करण्यासाठी व 7/12 उताराचे लॉक काढून देणेसाठी (अन लॉक करणेसाठी) यातील आरोपी लोकसेवक श्री. हेमंत चंद्रकांत फुलारी, पद- मंडळ अधिकारी, नेमणुक- उपळे (दुमाला) मंडळ, तहसिल कार्यालय, बार्शी यांनी पडताळणी कारवाई दरम्यान पंचासमक्ष 3,500/- रुपये लाचेची मागणी करुन तडजोडी अंती 3000/- रु लाच मागणीस मान्यता देवून सार्वजनिक कर्तव्य करण्यासाठी कायदेशीर परिश्रमाखेरीज अन्य पारितोषण म्हणून तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी करुन, सापळा कारवाईमध्ये 3000/- लाचेची रक्कम स्वतः स्विकारली म्हणून श्री. हेमंत चंद्रकांत फुलारी, वय- 53 वर्षे, पद- मंडळ अधिकारी, नेमणुक- उपळे (दुमाला) मंडळ, तहसिल कार्यालय, बार्शी रा. 407, चौथा मजला, मन्मित ब्लॉसम अपार्टमेंन्ट, जुळे सोलापूर यांचेविरूध्द मी भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988 चे कलम 7, प्रमाणे सरकारतर्फे कायदेशीर फिर्याद देत आहे.

माझा वरील फिर्यादी जबाब माझे सांगणेप्रमाणे टंकलिखीत करण्यात आला असून तो मी वाचून पाहीला असून बरोबर आहे.

हा फिर्यादी जबाब दिला.

समक्ष

पोहेकॉ 629 सानप

ठाणे अंमलदार
वैराग पोलीस ठाणे

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध दिसून आल्यामुळे):**

**(1)** **Registered the case and took up the investigation (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** kundan tukaram gavade (पोलीस निरीक्षक) **or (किंवा):**

**(2)** **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):** **Rank (हुद्दा):**

**No. (क्र.):** **to take up the Investigation (तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3)** **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**
**or (किंवा)**

**(4)** **Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):** **on point of jurisdiction (अधिकाराच्या दृष्टिकोनातून).**

**F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant /informant, free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली)**

**R.O.A.C. (आर.ओ.ए.सी.)**

**Registered by (नोंदणी अधिकारी)**

I.I.F.-I (एकीकृत अन्‍ वेषणफॉर्म - १)

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** kundan tukaram gavade

**Rank (हुद्दा):** I (Inspector)

**No. (क्र.):** PI

**14. Signature / Thumb impression of the complainant / informant (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा)**

**15. Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**I.I.F.-I (एकीकृत अन्‍ वेषणफॉर्म - १)**

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known / seen )**
**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्‍ या/पाहिलेल्‍ या) शारीरिक वैशिष्‍ टये, व्‍ यंग आणि इतर तपशील**

| S. No. (अ.क्र) | Sex (लिंग) | Date / Year Of Birth (जन्‍ मतारीख / वर्ष) | Build (बांधा) | Height (cms) (उंची(सें.मी) | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्‍ या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | 1973 | | - | | चेचकः क्र. |

| Deformities / Peculiarities (व्‍ यंग / वैशिष्‍ टये) | Teeth (दात) | Hair (केस) | Eye (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit (s) (पोषाखाच्‍ या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language/Dialect (भाषा/बोली) | Place of (चे ठिकाण) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्‍ याच्‍ या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्‍ यापेक्षा अधिक तपशील दिल्‍ यास फक्‍ त यातील रकान्‍ यांची नोंद घेतली जाईल)**